• बीड (महाराष्ट्र) • वर्ष ३ रे • अंक ३४६ • सोमवार,दि. १८ मार्च २०२४ • RNI-MAHMAR/2021/80074 • Post: Reg.No.L/164/RNP/Beed/2022-24 • पान १ • पाने ४ • किंमत ३ रूपये
• Beed (Maharashtra) • Year 3 • Issue 346 • monday 18 March 2024 • RNI-MAHMAR/2021/80074 • Post: Reg.No.L/164/RNP/Beed/2022-24 • Page1 • Pages 4 • Price 3




दैनिक
महाराष्ट्राचा बुलंद आवाज
| बीड | परभणी | संभाजीनगर | जालना | लातूर | धाराशिव | हिंगोली | नांदेड | नगर

# मराठवाडा पत्र

संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे




बीड • dailymarathwadapatra2021@gmail.com • https://marathwadapatra.com • https://epaper.marathwadapatra.com Mo. 9822152955

# लोकसभा निवडणुकीत उमेदवारांच्या खर्चावर निर्बंध

**मुंबई । वृत्तसेवा**

राज्यातील ४८ लोकसभा मतदारसंघासाठी निवडणुकीच्या तारखा जाहीर करण्यात आल्या आहेत. त्यामुळे आता इच्छुक उमेदवार देखील कामाला लागले आहेत. मात्र, लोकसभा निवडणुकीत प्रत्येक उमेदवाराला निवडणुकीत किती पैसे खर्च करावे यासाठी निवडणूक आयोगाने मर्यादा घालून दिली आहे. त्यामुळे निवडणूक आयोगाने दिलेल्या मर्यादापेक्षा अधिकच खर्च उमेदवाराला करता येणार आहे. निवडणूक आयोगाने दिलेल्या माहितीनुसार लोकसभेसाठी प्रत्येक उमेदवाराला खर्चाची मर्यादा ९५ लाख अशी देण्यात आली आहे. विशेष म्हणजे २०१४ पर्यंत ही मर्यादा ७० लाख होती.



आदर्श आचारसंहितेच्या कालावधीत निवडणूक खर्चावर देखरेख व नियंत्रण ठेवण्यात येणार असल्याच्ची माहिती निवडणूक आयोगाने दिली आहे. याकरीता राज्यस्तरावर आणि जिल्हास्तरावर नियंत्रण कक्षाची स्थापना करण्यात आली आहे. उमेदवाराने नामनिर्देशन पत्र भरल्यापासून त्याच्या निवडणूक खर्चाची गणना सुरु करण्यात येईल. मात्र, नामनिर्देशन भरण्यापूर्वी निवडणूक प्रचारासाठीचे साहित्य खरेदी केलेले असल्यास व त्याचा वापर नामनिर्देशनानंतर केला गेल्यास त्या खर्चाचाही समावेश निवडणूक खर्चामध्ये करता येईल. लोकसभा निवडणुकीकरीता महाराष्ट्रामध्ये प्रत्येक उमेदवाराला खर्चाची मर्यादा ९५ लाख इतकी ठेवण्यात आलेली आहे. तसेच महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीकरिता प्रत्येक उमेदवाराला खर्चाची मर्यादा ४० लाख इतकी आहे. राजकीय पक्षांच्या व उमेदवारांच्या जाहिराती प्रमाणिकरण करण्यासाठी राज्यस्तरावर व जिल्हास्तरावर माध्यम प्रमाणिकरण व संनियंत्रण समिती स्थापन करण्यात आल्या आहेत. त्याचप्रमाणे या समितीकडून पेड न्यूज संदर्भातही प्राप्त होणा-या तक्रारींवर कार्यवाही करण्यात येणार असल्याची माहिती निवडणूक आयोगाने दिली आहे. आदर्श आचारसंहितेच्या कालावधीत प्राप्त होणाऱ्या तक्रारींचा तातडीने निपटारा करण्यासाठी निवडणूक आयोगाने लतळसळश्र हे मोबाईल प विकसित केले आहे. यामध्ये दक्ष नागरिकाला एखाद्या ठिकाणी आचारसंहितेचा भंग होत असल्याचे निदर्शनास आल्यास त्या प्रसंगाचे सदर पमध्ये छायाचित्र अथवा व्हीडीओ काढून तक्रार नोंदविता येणार आहे व त्यावर जिल्हा प्रशासन तसेच मुख्य निवडणूक कार्यालयाकडून तातडीने कार्यवाही करण्यात येणार आहे. विशेष अशी तक्रार


पुढील पानावर

# पंकजा मुंडे यांना देशात सर्वाधिक मतांनी विजयी करणार -आ.सोळंके



**माजलगाव । प्रतिनिधी**

लोकसभेचा बिगुल वाजण्यास सुरुवात झाली आहे.आज केव्हाही आचार संहिता जाहीर होऊ शकते. दरम्यान बीड लोकसभा उमेदवारी माजी मंत्री पंकजा मुंडे यांना जाहीर करण्यात आली असून त्यांना देशात सर्वाधिक मताधिक्याने विजयी करण्याचा निर्धार आ. प्रकाश सोळंके यांनी व्यक्त केला. शनिवार दि.१६ रोजी दुपारी सोळंके महाविद्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत त्यांनी ही घोषणा केली.दरम्यान माजलगाव मतदार



संघात मंजूर करण्यात आलेल्या विविध विकास कामाची त्यांनी पत्रकारांना माहिती दिली. यावेळी त्यांनी पत्रकारांना सांगितले की एमआयडीसीत १७ कोटी रुपयांची पाणीपुरवठा योजना. क्रीडा संकुलासाठी ५ कोटी. केशवराज मंदिराच्या पुनर्बांधणी साठी ९ कोटी ४५ लाख.मनुर गोविंदपुर, मोठेवाडी, खाडेवाडी, शिंदेवाडी,चोपनवाडी या रस्त्यांसाठी मुख्यमंत्री सडक योजनेत २७ कोठी ८० लाख.तर वसंतराव नाईक तांडा सुधार योजनेअंतर्गत दोन कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. त्याचप्रमाणे बंद पडलेल्या उपसा जलसिंचन योजना पुन्हा सुरु करण्यात आले असून त्यासाठी अडीजशे कोटी रुपयांचा निधी प्राप्त झाला असल्याचेही ते म्हणाले.उपजिल्हा रुग्णालयातील डॉक्टरांच्या निवासस्थानासाठी ३० कोटी रुपये मंजूर करण्यात आले आहेत.यासह

पुढील पानावर



आष्टी तालुक्यासाठी वरदान ठरणाऱ्या महत्त्वाकांक्षी शिंपोरा ते खुंटेफळ साठवण तलाव पाईपलाईन कामाचा कार्यारंभ आदेश काढल्याबद्दल देवेंद्र फडणवीस यांचा आ.सुरेश धस यांनी सत्कार करतांना.

# कोणत्या पक्षाला किती निधी ? निवडणूक आयोगाकडून माहिती

**नागपूर । वृत्तसेवा**

विविध राजकीय पक्षांना मिळणाऱ्या निवडणूक निधीचे तपशील निवडणूक आयोगाने जाहीर केले आहेत. यात सगळ्यात जास्त निधी हा भाजपला मिळाला असून त्या खालोखाल तृणमूल काँग्रेस, काँग्रेस असा उतरता क्रम आहे. भाजपला सर्वाधिक म्हणजे सुमारे ६९८६.५ कोटी इतका निधी मिळाला आहे. त्या खालोखाल तृणमूल काँग्रेसला १३९७ कोटी, काँग्रेसला १३३४ कोटी इतका निधी मिळाला आहे. निधींचे पक्षवार तपशील - बीजेडी - ९४४.५ कोटी, वायएसआर काँग्रेस - ४४२.८ कोटी, टीडीपी - १८१.३५ कोटील सपा - १४.०५ कोटी, अकाली दल - ७.२६ कोटी, अण्णा द्रमुक - ६.०५ कोटी



# राजकीय पक्षांनी आदर्श आचारसंहितेच्या मार्गदर्शक तत्वाचे पालन करावे -जिल्हाधिकारी

**बीड । प्रतिनिधी**

लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या काळात ३९-बीड लोकसभा मतदार संघात आदर्श आचार संहिता लागू झाली असून राजकीय पक्षांनी आणि प्रतिनिधीनी त्याच्या मार्गदर्शक तत्वांचे पालन करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी दीपा मुधोळ मुंडे यांनी केले. जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी तथा जिल्हाधिकारी यांच्या



अध्यक्षतेखाली राजकीय पक्षांच्या प्रतिनिधीची वेठक झाली. यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी जिल्हा पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकूर जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी वासुदेव सोळंके, निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, उपविभागीय अधिकारी सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी कविता जाधव निवडणूक उपजिल्हाधिकारी महेंद्रकुमार कांबळे, प्रभारी जिल्हा माहिती अधिकारी अंजू निमसरकर आदी उपस्थित होते. यावेळी जिल्हाधिकारी म्हणाले, निवडणूकीसाठी नामनिर्देशनपत्र दाखल करतांना उमेदवारांनी निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयात ५ प्रतिनिधीनां प्रवेश देण्यात येईल यासाठी सोबत अणावयाची वाहने, आदीप्रसंगी आचार संहितेनुसार बंधने पाळली जावीत. राजकीय पक्षाशी निगडित विविध मंजुरी

पुढील पानावर

# लोकशाहीला सशक्त करणाऱ्या निवडणुकांमध्ये पत्रकारांचे सहकार्य मोलाचे -जिल्हाधिकारी

**बीड । प्रतिनिधी**

(जीमाका) लोकशाहीला सशक्त करणाऱ्या निवडणुकांमध्ये पत्रकारांची महत्त्वाची भूमिका असते. बीड जिल्ह्यात चौथ्या टप्प्यात होणाऱ्या सार्वत्रिक लोकसभा निवडणुकीमध्ये पत्रकारांचे सहकार्य मिळावे, असे आवाहन जिल्हाधिकारी दीपा मुधोळ मुंडे यांनी यावेळी केले. सार्वत्रिक लोकसभा निवडणूक २०२४ जाहीर झाली असून चौथा टप्प्यात बीड जिल्ह्यात १३ मे ला मतदान होणार आहे या अनुषंगाने जिल्हाधिकारी यांनी आज पत्रकार परिषदेचे आयोजन जिल्हाधिकारी कार्यालयात करण्यात आले, त्यावेळी जिल्हाधिकारी बोलत होत्या. याप्रसंगी जिल्हा पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकूर जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी



वासुदेव सोळंके, निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, उपविभागीय अधिकारी सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी कविता जाधव, उपजिल्हानिवडणूक अधिकारी महेंद्रकुमार कांबळे, प्रभारी जिल्हा माहिती अधिकारी अंजू निमसरकर आदी उपस्थित होते. निवडणुकीच्या काळात वर्तमानपत्राची भूमिका महत्त्वाची असून आदर्श आचार संहितेचे पालन वर्तमानपत्राकडूनही व्हावे, असे सांगून वर्तमानपत्रांनी यावेळी कुठल्याही पक्षाला अधिक महत्त्व न देता वस्तुनिष्ठ पद्धतीने बातम्या द्याव्यात, अशी अपेक्षा केली जिल्हाधिकारी यांनी यावेळी व्यक्त केली. निवडणुकीदरम्यान विविध समित्या गठित करण्यात येतात या अंतर्गत माध्यम प्रमाणिकरण व संनियंत्रण समिती तसेच माध्यम कक्ष गठित करण्यात आलेले आहे. माध्यम प्रमाणिकरण व संनियंत्रण समिती मुद्रित माध्यमे, इलेक्ट्रॉनिक मीडिया तसेच डिजिटल माध्यमांमध्ये गैरवाजवी पद्धतीने देण्यात येणाऱ्या बातम्यांवर करडी नजर ठेवणार असल्याचे सांगितले. एखाद्या मुद्रित, इलेक्ट्रॉनिक सामाजिक माध्यमावर आक्षेप असणाऱ्या बातमी आल्यास बातमी देणाऱ्यावर दंडात्मक कार्यवाही केली जाईल. त्यामुळे सर्वांनी निवडणुकीला पोषक असणाऱ्या बातम्या देऊन प्रशासनाला सहकार्य करावे, अशी अपेक्षा जिल्हाधिकारी यांनी यावेळी व्यक्त केली. एक सारख्या मथळयाच्या असणाऱ्या बातम्या अनेक वर्तमानपत्रात प्रकाशित होत असून या बातम्या पेड न्यूज अंतर्गत मोडले जातात असे आढळून आल्यास वर्तमानपत्रावर कारवाई करण्यात येईल. शासन मान्यता यादीवर नसलेले तसेच अनाधिकृतपणे काढले जाणाऱ्या वर्तमानपत्रावरही कारवाई होणार असल्याने यापुढे सर्वांनीच दक्षता घ्यावी असेही, जिल्हाधिकारी यांनी यावेळी सांगितले. विविध समाज माध्यमांवर चर्चा सत्रे आयोजित केली जातात यामध्ये लोकशाहीला अनुरूप आणि पोषक अशा चर्चा व्हाव्यात, अशी अपेक्षाही जिल्हाधिकारी यांनी यावेळी व्यक्त केली.

दैनिक मराठवाडा पत्र

संपादकीय

• सोमवार,दि. १८ मार्च २०२४ • पान २

## संपादकीय

# रामायण सांस्कृतिकसंचित




कश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंत शेकडो भाषा, जाती-धर्म, खाद्यसंस्कृती असणाऱ्या हिंदुस्थानला त्याचं सांस्कृतिक संचित एका समान सूत्रात बांधून ठेवतं. ते संचित आहे संस्कृतीचं, इथल्या वेगवेगळ्या तरीही एकमेकांत बेमालूमपणे मिसळून गेलेल्या विचारधारा आणि मूल्यांचं. रामायण आणि महाभारत ही हिंदुस्थानींच्या जगण्याचा संपूर्ण पैस उलडगून दाखवणारी महाकाव्ये आपलं संचितच आहेत. मर्यादापुरुषोत्तम श्रीरामाची आणि रामायणाची महती आजही हजारो वर्षांनंतर टिकून राहण्याचे कारणच हे आहे की, श्रीराम हा हिंदुस्थानी एकत्र कुटुंबव्यवस्था, न्याय्य समाजव्यवस्था यांचा प्रतिनिधी आहे. रामायण फक्त महाकाव्य नसून हिंदुस्थानी भावविश्वाचा एक चिरंतन उद्गार आहे. जगभरातील अनेक भाषांमध्ये रामकथेच्या विविध आवृत्त्या आल्या, पण वाल्मीकिरामायणाचं जनमानसाच्या हृदयात तेच स्थान आहे, जे हनुमंताच्या हृदयात श्रीरामांचं होतं. संपूर्ण वाल्मीकिरामायण समजून घ्यायला एक जन्मही अपुरा पडावा. मात्र या वाल्मीकिरामायणाचं ओघवतं, वाचकाभिमुख निरूपण करण्याचं शिवधनुष्य विख्यात जलतज्ज्ञ माधवराव चितळे यांनी लीलया पेललं आहे. चितळे हे जलक्षेत्रामधील नोबेल पारितोषिक समजल्या जाणाऱ्या अतिशय मानाच्या 'स्टॉकहोम' पुरस्काराचे मानकरी आहेत. मूळ वाल्मीकिरामायण समोर ठेवून त्यातील सर्ग, तत्कालीन संदर्भ यांचा आधार घेत बालकांड, अयोध्याकांड, सुंदरकांड अशी चितळे यांची रामकथेवरील ८८ सर्वांगसुंदर प्रवचने पुस्तकरूपात सादर केली आहेत. आपल्या संस्कृतीची वैशिष्ट्ये असणाऱ्या एकत्र कुटुंबपद्धतीचा आदर्शप्रमुख, त्याअनुषंगाने येणारी सगळी नाती, जबाबदारी आणि प्रेमाने सांभाळणारा राम हिंदुस्थानींना प्रिय आहेच, पण संपूर्ण रामायण हे त्या कालखंडाचं 'सोशल इंजिनीअरिंग' दर्शवणारा लख्ख आरसा आहे. भूगोल, भाषा, खाद्यसंस्कृती, न्यायव्यवस्था, राजकारण, धर्म, समाजकारण या सगळ्यांचा परामर्श घेत रामकथा आकार घेते. निष्कांचन अवस्थेत रामाने अयोध्या सोडल्यावर रावणासारख्या महाबलशाली, अपराजित राजाशी लढण्यासाठी वानरसेना उभारली. त्याचा प्रमुख हनुमंत हा नेमका कोण होता? जांबुवंत, जटायू, सुग्रीव आपल्याला अधिक मानवीय का वाटतात? याची उत्तरं या रामकथेत मिळतात. आश्रमाबद्दल येणारे संदर्भदेखील अतिशय रंजक आणि कम्युनिटी लिव्हिंग म्हणजे नेमकं काय याची उत्तरं यात आहेत. राष्ट्र आणि राज्य या संकल्पनेत नेहमीच अनेकांचा गोंधळ होतो. 'रामराज्य' ही कविकल्पना का नाही याचं अगदी स्पष्ट उत्तर देताना चितळे काय सांगतात पाहा. हिंदुस्थानी प्रशासन तंत्र कसं असावं याचं आदर्श उदाहरण अयोध्येत होतं. ती आदर्श समाजरचना 'रामराज्य' या एका शब्दाने आपण व्यक्त करत असतो. किंबहुना आजच्या हिंदुस्थानी प्रशासनासमोर 'रामराज्य' हाच आदर्श आहे. आपल्या संसदेच्या छतावर रामायणातील प्रसंगचित्रे आहेत. हिंदुस्थानच्या राज्य घटनेची पहिली प्रत रामायणाच्या पार्श्वभूमीवर छापलेली आहे. रामराज्य हा हिंदुस्थानी लोकजीवनाचा अजूनही आदर्श व अंतिम उद्दिष्ट रामराज्य हेच आहे. ते शतकानुशतके जागृत राहिलं आहे. अशी जी व्यवस्था इक्ष्वाकूच्या वंशजांनी परंपरेने पाळली होती, त्याला विजयनगरच्या काळात, शिवाजी महाराजांच्या काळात उजाळा द्यायचा यशस्वी प्रयत्न केला गेला. त्यामुळे ज्याला हिंदुस्थानी प्रशासन व्यवस्थेचा नीट अभ्यास करायचा आहे. त्याने रामायणातील हे काही सर्ग खोलात अभ्यासले पाहिजेत. व्यक्तिस्वातंत्र्याच्या काही चुकीच्या आधुनिक कल्पना अनेकदा आपल्याला आपल्याच उन्नत, उदात्त, सर्वसमावेशक संस्कृतीपासून तोडतात. मुळांपासून विलग झालेलं झाड किती तग धरेल? विशेषत: पुढच्या पिढीचं भविष्य बघता त्यांची नैतिक घसरण हा अत्यंत काळजीचा विषय ठरावा. रामायणासारखी महाकाव्ये निश्चितच ही घसरण रोखण्यात मदत करतील.

# पारदर्शक निवडणुकीसाठी संदर्भिका महत्वपूर्ण -जिल्हाधिकारी



**बीड । प्रतिनिधी**

जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी तथा जिल्हाधिकारी दीपा मुधोळ मुंडे यांच्या हस्ते ३९ - बीड लोकसभा मतदार संघाच्या संदर्भिकेचे प्रकशन आज झाले. निवडणूक प्रक्रिया पूर्णपणे पारदर्शक असावी यासाठी ही संदर्भिका महत्वपूर्ण असल्याचे जिल्हाधिकारी यावेळी म्हणाल्या. पत्रकार परिषदेपूर्वी जिल्हाधिकारी यांच्या हस्ते संदर्भिकेचे प्रकाशन करण्यात आले. याप्रसंगी जिल्हा पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकूर जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी वासुदेव सोळंके, निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, उपविभागीय अधिकारी सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी कविता जाधव, उपजिल्हानिवडणूक अधिकारी महेंद्रकुमार कांबळे, प्रभारी जिल्हा माहिती अधिकारी अंजू निमसरकर आदी उपस्थित होते. ही संदर्भिका जिल्हा निवडणूक अधिकारी यांच्याकडून प्रकाशित करण्यात आली असून यामध्ये भारतीय निवडणूक आयोग, मुख्य निवडणूक अधिकारी, बीड जिल्हा प्रशासनातील वरिष्ठ अधिकारी १८ व्या लोकसभा सार्वत्रिक निवडणूक कार्यक्रम, निवडणुकीदरम्यान बनलेल्या विविध समित्या त्यांचे नोडल अधिकारी, निवडणूक निर्णय अधिकारी यांचे दूरध्वनी क्रमांक तसेच मोबाईल क्रमांक दिलेले आहे. एक जानेवारी २०२४ च्या आकडेवारीनुसार बीड लोकसभा निवडणूक मतदार संघामध्ये एकूण मतदारांची आकडेवारी, विधानसभा मतदारसंघ व तालुका निहाय मतदार केंद्र, मतदान केंद्राची माहिती ईव्हीएम आणि व्हीव्हीपॅट, माध्यम प्रमाणीकरण व संनियंत्रण समितीचे कामकाज, राज्य समितीची तसेच जिल्हास्तरीय समितीची रचना यासह बीड लोकसभा मतदारसंघात आतापर्यंतचे खासदार, १९५२ पासून ते २०१९ पर्यंत निवडून आलेले खासदार यांची सविस्तर माहिती देण्यात आलेली आहे. ही पुस्तिका निवडणुकी कालावधीत पत्रकारांना विशेषत: उपयोगी असल्याचे जिल्हाधिकारी यावेळी म्हणाल्या.

पान १ वरून

## राजकीय पक्षांनी आदर्श

एक खिडकी मधून दिली जाणार असल्याची माहिती त्यांनी यावेळी दिली. यासह राजकीय पक्ष आणि उमेदवार यांच्यावरील टीका त्यांची धोरणे कार्यक्रम पूर्वीची कामगिरी आणि कार्य यांच्याशी संबंधित असावी. शांततापूर्ण आणि उपद्रव रहित जीवन जगण्याचा प्रत्येक व्यक्तीचा अधिकार आहे त्या अधिकाराचे निवडणुकीच्या काळात पण जतन व्हावे अशी अपेक्षा जिल्हाधिकारी यांनी यावेळी व्यक्त केली. सभेसाठी लागणाऱ्या प्रत्येक गोष्टींची पूर्वपरवानगी घेण्यात यावी. सभांमध्ये सुव्यवस्था बिघडणार नाही यासाठी पोलीस बंदोबस्तची मदत घ्यावी. मतदानाच्या दिवशी उमेदवार व त्यांची निवडणूक मतदान प्रतिनिधी याव्यतिरिक्त फक्त निवडणूक आयोगाकडून वैद्य प्राधिकार पत्र मिळालेल्या व्यक्तींनाच कोणत्याही मतदान कक्षा प्रवेश करता येईल इतर व्यक्ती कोणीही उच्चपदस्थ असली तरी तिला अटीतून सूट मिळणार नाही, अशी माहिती जिल्हाधिकारी यांनी यावेळी दिल्या. जिल्ह्यातील काही शासकीय इमारतीचे बांधकाम होत असल्यामुळे लगतच्या चंपावती शाळेत निवडणुकीशी निगडित कार्यक्रम होतील याची माहिती पण जिल्हाधिकारी यांनी यावेळी दिली. बीड जिल्ह्यात चौथ्या टप्प्यात १३ मे ला निवडणूक होणार असून हा काळ विद्यार्थ्यांसाठी सुट्ट्यांचा असतो त्यामुळे निवडणूक प्रक्रियेत अधिकाधिक लोकांनी आणि विशेषत: तरुणांनी भाग घ्यावा असेही आवाहन जिल्हाधिकाऱ्यांनी यावेळी केले.

यावेळी भारतीय निवडणूक आयोगाने दिलेल्या सोयी सुविधेबाबतचीही माहिती जिल्हाधिकाऱ्यांनी दिली या अंतर्गत दिव्यांगांसाठी तसेच ८० वर्षपेक्षा अधिक वयोगटातील व्यक्तींसाठी घरपोच मतदानाची सुविधा उपलब्ध असेल. मतदान केंद्रावर व्हीलचेअरसह मूलभूत सुविधा असतील याबाबतही सांगितले. यावेळी दिव्यांग बूथ तसेच महिलांचे बूथ तयार केले जातील. मात्र अधिकाधिक मतदारांनी मतदान केंद्रावर येऊन मतदान करावे आणि इतरांनाही प्रोत्साहन करावे यासाठी राजकीय पक्षांनी त्याप्रमाणे प्रचार प्रसार करावा अशा सूचनाही जिल्हाधिकारी यांनी यावेळी केल्या.

काही मतदाराचे दोन ठिकाणी नावे असतात, अशा मतदारांनी कुठल्याही एका ठिकाणी नाव नोंदवावे यासाठी राजकीय पक्षांनीही याबाबत मतदारांना जागृत करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी यांनी यावेळी केले.

जिल्हा पोलीस अधीक्षक श्री ठाकूर यांनी मतदारसंघात स्टार प्रचारकांच्या प्रचार सभा, प्रचार आदीवेळी कायदा व सुव्यवस्था भंग होऊ नये यासाठी काळजी घ्यावी, असे सांगितले. अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी श्री सोळंके यांनी निवडणूक काळात भरारी पथके, निगराणी पथके कार्यरत असून आचार संहिता भंगाच्या तक्रारीचा तातडीने दखल घेण्यात येईल असे सांगितले. याप्रसंगी निवडणुकीची तयारी, निवडणूक कार्यक्रमाचा दिनांक देऊन प्रचार व प्रसिध्दीसाठी सार्वजनिक मालमत्तेच्या विदुपीकरणापासून संरक्षण आदीसाठी नियम यांची माहिती दिली. तसेच आदर्श आचार संहिता मार्गदर्शक तत्वांच्या माहिती देण्यात आल्या. बैठकीसाठी आम आदमी पक्ष, शिवसेना शिंदे गट तसेच शिवसेना उद्धव ठाकरे गट, एम आय एम, महाराष्ट्र नवनिर्माण सेना, कांग्रेस, बहुजन समाजवादी पक्ष, कम्युनिष्ट पक्ष. राष्ट्रवादी काँग्रेस अजित दादा पवार गट, आदी पक्षांचे प्रतिनिधी उपस्थित होते. यावेळी राजकीय पक्षांना निवडणुकीशी संबंधित माहिती पुस्तिका देण्यात आली.

## लोकसभा निवडणुकीत

आल्यास १०० तासाच्या आत त्या तक्रारींचा निपटारा केला जाणार असल्याचे निवडणूक आयोगाने स्पष्ट केले आहे.

पहिला टप्पा : मतदान- १९ एप्रिला : रामटेक, नागपूर, भंडारा -गोंदिया, गडचिरोली-चिमूर, चंद्रपूर (विदर्भातील ५ मतदारसंघ)

दुसरा टप्पा : मतदान- २६ एप्रिल : बुलढाणा, अकोला, अमरावती, वर्धा, यवतमाळ-वाशिम, हिंगोली, नांदेड, परभणी (एकूण मतदारसंघ संख्या ८ आहे)

तिसरा टप्पा : मतदान- ७ मे : रायगड, बारामती, धाराशीव, लातूर, सोलापूर, माढा, सांगली, सातारा, रत्नागिरी-सिंधुदुर्ग, कोल्हापूर, हातकणंगले (एकूण मतदारसंघ संख्या ११ आहे)

## पंकजा मुंडे यांना देशात

अनेक विकास कामांची माहिती त्यांनी यावेळी त्यांनी पत्रकारांना सांगितले की एमआयडीसीत १७ कोटी रुपयांची पाणीपुरवठा योजना. क्रीडा संकुलासाठी ५ कोटी. केशवराज मंदिराच्या पुनर्बांधणी साठी ९ कोटी ४५ लाख.मनुर गोविंदपुर,मोठेवाडी,खाडेवाडी, शिंदेवाडी,चोपनवाडी या रस्त्यांसाठी मुख्यमंत्री सडक योजनेत २७ कोठी ८० लाख.तर वसंतराव नाईक तांडा सुधार योजनेअंतर्गत दोन कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. त्याचप्रमाणे बंद पडलेल्या उपसा जलसिंचन योजना पुन्हा सुरु करण्यात आले असून त्यासाठी अडीजशे कोटी रुपयांचा निधी प्राप्त झाला असल्याचेही ते म्हणाले.उपजिल्हा रुग्णालयातील डॉक्टरांच्या निवासस्थानासाठी ३० कोटी रुपये मंजूर करण्यात आले आहेत.यासह अनेक विकास कामांची माहिती त्यांनी यावेळी पत्रकारांना दिली.दरम्यान येत्या लोकसभेच्या अनुषंगाने विचारलेल्या प्रश्नावर त्यांनी सांगितले की,महायुतीकडून पंकजा मुंडे यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे.त्यांना देशात सर्वाधिक मतांनी विजयी करण्याचा आमचा प्रयत्न राहील.अशी ग्वाही त्यांनी यावेळी व्यक्त केली.यावेळी शिवसेनेचे तालुका अध्यक्ष तुकाराम येवले,सभापती जयदत्त नरवडे, माजी समाज कल्याण सभापती कल्याण आबूज,अच्युत लाटे, उपस्थित होते.

## फौजदारी न्यायालयाच्या नूतन इमारतीचे न्यायमूर्तींच्या हस्ते उद्घाटन

बीड - शिरूर येथील दिवाणी व फौजदारी - न्यायालयाच्या नूतन वास्तूचा उदघाटन समारंभ माननीय न्यायमूर्ती राजेंद्र गोविंद अवचट, उच्च न्यायालय मुंबई तथा वरिष्ठ पालक न्यायमूर्ती बीड न्यायिक जिल्हा यांच्या शुभहस्ते संपन्न झाला. या कार्यक्रमास माननीय न्यायमूर्ती श्री. मधुसूदन जोशी, उच्च न्यायालय, मुंबई तथा पालक न्यायमूर्ती बीड न्यायिक जिल्हा हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी मा.श्री. आनंद लक्ष्मीचंद यावलकर, प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, बीड हे उपस्थित होते. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश मा.श्री. आनंद लक्ष्मीचंद यावलकर,,कार्यकमाच्या प्रास्ताविकेत न्यायालयाच्या नूतन इमारतीमध्ये असणा-या सोयी-सुविधांबाबत सविस्तर माहिती दिली. यामध्ये ई-सेवा केंद्र, व्हिडिओ कॉन्फरन्सिंग सुविधा, जनरेटर सुविधा, महिला व पुरूष विधिज्ञ यांचेकरिता स्वतंत्र बाररूम इत्यादी सुविधांबाबत माहिती दिली. शिरूर तालुका वकील संघाचे अध्यक्ष ॲड.बी. बी. जायभाये यांनी आपल्या भाषणामध्ये शिरूर न्यायालयाच्या नवीन इमारतीच्या बांधकामाबाबत आलेल्या अडचणींची विस्तृतपणे माहिती देवून त्यामध्ये सुधारणा करण्यासाठी कशा प्रकारे प्रयत्न करण्यात आले या बाबत सविस्तरपणे माहिती दिली.

## सुभेदार मल्हारराव होळकर जयंती साजरी

**लिंबागणेश । वृत्तसेवा**

बीड तालुक्यातील लिंबागणेश येथील ग्रामस्थांच्या वतीने दि.१६ मार्च शनिवार रोजी होळकर शाहीचे संस्थापक सुभेदार मल्हारराव होळकर यांच्या ३३१ व्या जयंतीनिमित्त प्रतिमेला पुष्पहार अर्पण करत श्रीफळ फोडून मोठ्या उत्साहात जयंती साजरी करण्यात आली. मल्हारराव होळकर यांचा जाज्वल्य इतिहास युवकांना प्रेरणादायी असुन विविध उपक्रमांद्वारे लोकांपर्यंत पोहचवण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत असे प्रतिपादन डॉ.गणेश ढवळे यांनी केले. राजेभाऊ आप्पा गिरे, बाळकृष्ण थोरात, संदिप मुळे, शहादेव धलपे, हनुमंत वैद्य,सुधीर वाणी, विक्रांत वाणी, अभिजित गायकवाड, सुरेश निर्मळ,दादा गायकवाड, रोहिदास जाधव,सुशील लगास, शिवम कोकाटे, विशाल तागड अक्षय नाईकवाडे, महावीर मुळे,विशाल लगास, गणेश तागड, विश्वंभर मुळे उपस्थित होते.

## ५१ महिलावर बिन टाका कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया संपन्न

तलवाडा - गेवराई तालुक्यातील तलवाडा प्राथमिक आरोग्य केंद्र अंतर्गत ४५ गावाचा समावेश आहे.या गावातील महिला कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया करण्यासाठी तलवाडा प्रथमिक आरोग्य केंद्रात नोंद करतात तर दर महिन्याला बिन टाका कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया कॅम्प ठेवण्यात येत आहे. आज दिं.१६/३/२०२४ रोजी सकाळी बिन टाका कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया कॅम्प ठेवण्यात आला होता या कॅम्पमध्ये ५१ महिलावर बिन टाका कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया करण्यात आली आहे.यावेळी डॉ धनाजी बनसोडे ,डॉ पूजाताई शेळके , डॉ अक्षय खरवडे , डॉ. नितीन काकड , तर सर्जन म्हणून स्त्री रोग तज्ञ डॉ शिवनाथ वाघमारे, या कॅम्प यशस्वी करण्यासाठी , श्रीम बोराडे , गालफाडे , आत्तमवाड , श्रीम. मुंडलीक . श्रीम.मिटकर, शेख गफार, आशा वर्कर,यांनी सहकार्य केले.

# तृतीय अखंड हरिनाम सप्ताहाची भक्तगणांच्या उपस्थितीत सांगता

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातील अंजनवती ही श्री संत तुकाविप्र महाराज यांची जन्मभूमी आहे. येथील अमरजा नदीच्या काठावर पुरातन मठ आहे याच प्रमाणे सातारा जिल्ह्यात कोरेगाव तालुक्यातील तारगाव येथे कृष्णेच्या काठावर श्री संत तुकाविप्र महाराजांचा भव्य मठ असून याच ठिकाणाला श्रीक्षेत्र बोरबन म्हणून संबोधले जाते या ठिकाणी महाशिवरात्रीचे औचित्य साधत भाविकभक्तांकडून अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन केले गेले. यावेळी किर्तनाला मठाधिपती कुमार महाराज विप्र,श्री संत तुकाविप्र महाराज पालखी प्रतिष्ठानचे अध्यक्ष अर्जुन महाराज पाटील, गोवर्धन(मिठु) महाराज कोरडे यांच्यासह दोन्हीही धार्मिक स्थळामधील ग्रामस्थ व भक्तगण उपस्थित होते. यावेळी तुकाविप्र महाराजांचे वंशज कुमार महाराज विप्र यांनी काल्याचे किर्तन करताना सांगितले की अखंड हरिनाम सप्ताहातील काला म्हणजे कृषी प्रधान संस्कृतीचे प्रतिक असून भगवान श्रीकृष्ण हे राजपुत्र असूनही पेंद्या, वाकड्या, लंगड्या, सुदामा आदी सर्वसामान्य कुटुंबातील गुराखी सवंगड्यांची शिदोरी जमा करुन त्याचा एकत्रित काला बनवुन सर्वांनी भक्षण केला यावेळी भेदभाव विसरून एकत्रित केलेल्या तत्कालीन काल्याची आजही सर्वत्र अखंड हरिनाम सप्ताहात उजळणी करून समाजात एकोपा नांदावा हा संदेश आपण देत असतो असे त्यांनी सांगितले. या प्रसंगी उपस्थित मान्यवर व बीड, सातारा तसेच महाराष्ट्रातील विविध ठिकाणावरून आलेल्या भाविक भक्तांबद्दल अंजनवती येथील बाळासाहेब मोरे म्हणाले की कुमार महाराज विप्र यांनी शासकीय सेवा करत असतानाच सामाजीक बांधीलकी जोपासली असून पगारातील पाच लक्ष रुपये खर्चून तुकाविप्र महाराजांचे अडगळीत पडलेले अध्यात्मिक साहित्य ग्रंथरूपाने समाजासमोर आणण्याचे पवित्र कार्य केले आहे संत आनंदराव येडे महाराजांनी अंजनवती व पंचक्रोशीतील नागरिकांना बोरबन ठिकाणाची ओळख करून देण्याचे काम केले. श्री संत तुकाविप्र महाराज पालखी प्रतिष्ठानचे अध्यक्ष अर्जुन महाराज पाटील यांनी कै. प्रभाकर बाबा विप्र व कै.भानुदासबुवा विप्र यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू केलेला श्रीक्षेत्र पंढरपूर व श्रीक्षेत्र पैठण पायी दिंडी सोहळा गेली २३ वर्षापासून अथक परिश्रमातून टिकवून ठेवण्याचे कार्य केले असून पंचेविसावा वर्षपुर्ती सोहळा अंजनवती व तारगाव येथील नागरिकांच्या सहकार्यातून भव्य स्वरूपात साजरा करण्यात येईल जेणेकरून अंजनवती व बोरबन ही दोन्ही अध्यात्मिक ठिकाणे महाराष्ट्राच्या नकाशावर येतील तारगावचे सरपंच लक्ष्मण (तात्या)निकम त्यांचे सहकारी व गावकर्यांनी तन-मन-धनाने या सप्ताहाला सहकार्य केले अंजनवतीचे सुसंस्कारीत सरपंच कैलासदादा येडे राजकीय क्षेत्रा बरोबरच अध्यात्मिक वारसा चालवण्याचे प्रामाणिक प्रयत्न करत असतात त्याच बरोबर रौळसगाव येथील प्रामाणिकपणे शेती व्यवसाय करून उपजीविका भागवणारे गोवर्धन(मिठु) महाराज कोरडे हे अंजनवती सह पंचक्रोशीतील सर्व आध्यात्मिक कार्याला उपस्थिती लावतात त्याचबरोबर सखाराम मोरे हे सर्व दिंडी सोहळे व हरिनाम सप्ताहाला मोफत ट्रक हे वाहन उपलब्ध करून देतात त्यामुळे या अध्यात्मिक सप्तपदींचा मी विशेष गौरव करतो असे यावेळी बाळासाहेब मोरे म्हणाले त्याचबरोबर गेली तीन वर्षांपूर्वी अंजनवती येथील श्री संत तुकाविप्र महाराज व आई सत्वाईदेवी या दोन्ही धार्मिक स्थळांचा प्रस्ताव पर्यटन विभागाकडे तत्कालीन भारतीय जनता पार्टीचे जिल्हाध्यक्ष रमेश पोकळे यांच्या माध्यमातून दाखल केले ना.गिरीश महाजन यांचे स्वीय सहाय्यक, अप्पर सचिव मंत्रालय मुंबई व अंजनवती येथील मठाधिपती विवेक महाराज विप्र यांचे मेहुणे निशिगंधजी देशपांडे साहेबांच्या माध्यमातून व शिवसेनेचे माजी जिल्हाप्रमुख चंद्रकांत नवले यांच्या सहकार्यातून सुमारे दीड कोटी निधी मंजूर झाला आहे तसेच अंजनवती येथील मठामध्ये सप्ताह सुरू असताना माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी नुकतीच भेट देऊन गावकर्यांना मठासाठी निधी मंजूर करून आणतो असा शब्द दिला होता अवघ्या एक-दीड महिन्यातच त्यांनी ६० लक्ष रुपये निधी मंजुर झाल्याचे पत्र सरपंचाकडे सुपूर्द केल्यामुळे अंजनवतीकरांनी त्यांना धन्यवाद दिले आहेत अंजनवतीच्या धर्तीवर बोरबन या ठिकाणाचा देखील कायापालट झाला पाहिजे यासाठीही सर्वांनी प्रयत्न करावेत अशी विनंती यावेळी बाळासाहेब मोरे यांनी केली. भरत काटवटे, विष्णूबप्पा येडे, श्रीमंतकाका येडे, पपन विप्र, परमेश्वर माळवाले, भगवानभाऊ येडे, आश्रुबा काटवटे, श्रीरंगबापू येडे, खवणे दादा, पांडुरंग आनंदराव येडे, शेषमोहन येडे, तांदळे फौजी, आश्रुबा बाबुराव येडे, जालिंदर माळवाले, पांडुरंग काटवटे, सुंदर पांचाळ,बंडु काटवटे, रामदास(नाना) मोरे, तुकाराम पांडुरंग येडे, अण्णासाहेब येडे, महादेव काटवटे, केशव येडे, तुकाराम मोरे,काळे चेअरमन घारगावकर, हरीओम शेळके,रमेश बहीर, गोवर्धन जाधव सर, अर्जुन माळवाले, दत्ता त्रींबक येडे, रामेश्वर काटवटे,सुदाम गोविंदराव येडे, हनुमान आमटे यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर, माता-भगिनी व भाविक भक्तांची मोठी उपस्थिती होती.



## लोकसभेसाठी मविआचा फॉर्म्युला ठरला?

मुंबई – मुंबईतील शिवाजी पार्क येथे होणाऱ्या राहुल गांधी यांच्या सभेने राज्यातील महाविकास आघाडी आणि देशपातळीवरील इंडिया आघाडीच्या लोकसभा निवडणुकीच्या प्रचाराचा नारळ फुटणार आहे. या सभेपूर्वी महाविकास आघाडीच्या गोटामधून महत्त्वाची माहिती समोर येत आहे. गेल्या अनेक महिन्यांपासून महाविकास आघाडीमध्ये असलेला जागावाटपाचा तिढा अखेर सुटल्याचं वृत्त समोर येत असून, या जागावाटपामध्ये उद्धव ठाकरेंची शिवसेना उबाठा पक्ष सर्वात मोठा भाऊ ठरल्याचे सूत्रांकडून सांगण्यात येत आहे. महाविकास आघाडीमधील जागावाटपानुसार शिवसेना उबाठा २२ जागांवर निवडणूक लढणार असून, काँग्रेस १६ आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष १० जागांवर लढण्याची शक्यता आहे. या जागावाटपामध्ये महाविकास आघाडीने वंचितचा विचार केलेला नाही. मात्र वंचित सोबत आल्यास महाविकास आघाडी वंचितला चार जागा सोडू शकते. जागावाटपाबाबत सूत्रांकडून येत असलेल्या माहितीनुसार उद्धव ठाकरेंच्या नेतृत्वाखालील शिवसेना उबाठा पक्षाला ४८ पैकी २२ जागा देण्यात येतील.

## मोफत धान्य मिळणार!

मुंबई – लोकसभा निवडणुकीच्या तारखा मुख्य निवडणूक आयुक्तांनी जाहीर केल्या असून निवडणूक सात टप्प्यात घेतली जाणार आहे. या निवडणुकीच्या पार्शवभूमीवर केंद्र सरकार लोक कल्याणकारी योजनांची सुरुवात करत आहे. जेणे करून देशातील कोट्यवधी लोकांपर्यंत याचा फायदा पोहोचणार. ही योजना राबविली जाणार आहे. या योजनेअंतर्गत केंद्र सरकार देशातील ८१ कोटी जनतेला पाच वर्ष म्हणजे २०२८ पर्यंत मोफत रेशन उपलब्ध करून देणार आहे. केंद्र सरकारने ही योजना नोव्हेम्बर २०२३ मध्ये पंतप्रधान गरीब कल्याण अन्न योजना पाच वर्षांसाठी वाढविण्याचा निर्णय घेतला.या योजनेमुळे केंद्र सरकारवर भार पडणार आहे. ही योजना कोरोनाकाळात पहिल्या ३ महिन्यांसाठी सुरु केली होती. मोफत रेशन योजने अंतर्गत गरीब आणि गरजू परिवारांना माहियाचे ५ किलो तांदूळ आणि ५ किलो गहू मोफत देण्यात येते तसेच डाळी देखील प्रत्येक परिवाराला मोफत दिले जाते. या योजनेचा लाभ घेण्यासाठी परिवाराकडे वैध रेशनकार्ड असणे बंधनकारक आहे. ही योजना सरकारी असून सर्व राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांना लागू आहे. गरजू आणि गरीब नागरिकांना अन्न सुरक्षा देण्यासाठी ही योजना सुरु आहे.

## राज्यात काही मतदारसंघात मतदान प्रक्रियेत बदल

मुंबई : ईव्हीएम नको, बॅलट पेपरवर मतदान घ्या, ही विरोधकांची मागणी केंद्रीय निवडणूक आयोगाने फेटाळली असली, तरी महाराष्ट्रातील काही आणि त्यातही मराठवाड्यातील लोकसभा मतदारसंघांमध्ये उमेदवारसंख्या वाढल्यास ईव्हीएम रद्द होऊन बॅलट पेपरवर मतदान होणे शक्य आहे. ईव्हीएम यंत्राची क्षमता केवळ ३८४ उमेदवारांच्या नोंदणीचीच असल्यामुळे त्यापुढे एकजरी उमेदवार वाढला, तर संबंधित मतदारसंघात बॅलेट पेपरवर निवडणूक घ्यावी लागेल, असे राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोकलिंगम यांनी स्पष्ट केले. मराठा बांधवांच्या सग्यासोयर्यांनाही आरक्षण मिळण्याबाबत सरकारने ठोस निर्णय अद्याप घेतलेला नाही. लोकसभा निवडणुकीत प्रत्येक गावातून २५ मराठा उमेदवार उभे करण्याचा इशारा दिला आहे. केंद्रीय निवडणूक आयोगाने लोकसभा निवडणुकांचे वेळापत्रक जाहीर केल्यानंतर महाराष्ट्रातील तयारीची माहिती देण्यासाठी राज्य निवडणूक आयोगाने बोलावलेल्या पत्रकार परिषदेत याकडे लक्ष वेधले असता चोकलिंगम म्हणाले, उमेदवार संख्या मर्यादेपेक्षा वाढल्याने यापूर्वीही बॅलेट पेपरचा वापर करण्यात आला होता. महाराष्ट्रात अशी परिस्थिती निर्माण झाल्यास संबंधित ठिकाणी बॅलेट पेपरवर निवडणूक घेण्याबाबत विचार केला जाईल.

## संभाजीनगरात लोकसभेसाठी ३० लाख मतदार मतदानाचा हक्क बजावणार

संभाजीनगर : औरंगाबाद लोकसभा मतदारसंघात १८ व्या लोकसभा निवडणूकीसाठी १३ मे रोजी मतदान होणार आहे. केंद्रीय निवडणूक आयोगाने आज दुपारी पत्रकार परिषदेत देशातील लोकसभेच्या निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केला. राज्यात पहिल्या पाच टप्प्यात मतदान होणार आहे. जिल्ह्यात ३० लाख ३१ हजार ३१४ मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहेत. यात फर्स्ट टाइम व्होटर म्हणजेच विशीच्या आतील ४१ हजार २७७ मतदार असून, ते पहिल्यांदाच मतदान करणार आहेत. एकूण मतदारांच्या तुलनेत हे प्रमाण १.३६ टक्के आहे. जिल्ह्यात ६० वर्षांपेक्षा अधिक वय असलेले १६.८६ मतदार आहेत. ५ लाख १० हजार ९०५ मतदार सीनिअर आहेत. ६० ते ६९ वय असलेले २,७४,९६४ मतदार आहेत. एकूण मतदारांच्या तुलनेत त्यांचे प्रमाण ९.७ टक्के आहे. ७० ते ७९ वयातील १,५१,४७१ मतदार असून, त्यांचे प्रमाण ५.०० टक्के, तर ८० हून अधिक वय असलेले ८४,४७० मतदार असून, त्यांचे प्रमाण २.७९ टक्के आहे.

# ७ टप्प्यांत मतदानाचा मोदींना फायदा?

**नागपूर । वृत्तसेवा**

निवडणूक आयोगाने शनिवारी पत्रकार परिषद घेऊन १८ व्या लोकसभा निवडणुकांची घोषणा केली. निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांनी निवडणुकांच्या तारखा जाहीर केल्या आहेत. 'चुनाव का पर्व, देश का गर्व' या घोषवाक्यासह यंदा लोकशाहीचा उत्सव म्हणजेच लोकसभा निवडणुकांचा कार्यक्रम पार पडत आहे. जगातील सर्वात मोठ्या लोकशाहीची निवडणूक प्रक्रिया पार पडत असून ९७.८ कोटी मतदार मतदानाचा हक्क बजावणार असल्याचे यावेळी मुख्य निवडणूक आयुक्तांनी सांगितले. देशातील लोकसभेच्या ५४३ जागांसाठी सात टप्प्यांत मतदान होणार आहे. याआधीही २०१४ आणि २०१९ मध्ये सात टप्प्यांत मतदान झाले होते. निवडणूक आयुक्त



राजीव कुमार यांनी तारखा जाहीर करण्याआधी विविध मुद्द्यांवर प्रकाश टाकला. कोणत्या वयोगटातील किती मतदार, तृतीयपंथी मतदारांची संख्या, ज्येष्ठ नागरिक आणि १०० हून अधिक वय असलेल्या मतदारांची आकडेवारी सांगितली. तसेच त्यांनी निवडणुकीच्या काळात हिंसा करणाऱ्यांवर कडक कारवाई करणार असल्याचा इशारा दिला. यावेळी माध्यमांच्या प्रतिनिधिंनी निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांना काही प्रश्न केले. ७ टप्प्यांत होत असलेल्या मतदानाचा सत्ताधारी पक्षाला फायदा होतो या विरोधकांच्या आरोपावर बोलताना राजीव कुमार म्हणाले की, भौगोलिक परिस्थिती, सण, परीक्षा आणि इतर घटक लक्षात घेऊन ७ टप्पे आवश्यक आहेत असे निदर्शनास आले. त्यामुळे सात टप्प्यात मतदान प्रक्रिया पार पडेल. दरम्यान, महाराष्ट्रात ५ टप्प्यात मतदान प्रक्रिया पार पडणार आहे. त्यानुसार १९ एप्रिल, २६ एप्रिल, ७ मे, १३ मे आणि २० मे २०२४ रोजी मतदान प्रक्रिया पार पडणार आहे. तर देशातील संपूर्ण लोकसभा निवडणुकांचा निकाल ४ जून रोजी जाहीर होईल.

पहिला टप्पा– १९ एप्रिल – रामटेक, नागपूर, भंडारा–गोंदीया, गडचिरोली–चिमूर, चंद्रपूर दुसरा टप्पा–२६ एप्रिल – बुलडाणा, अकोला, अमरावती, वर्धा, यवतमाळ – वाशिम, हिंगोली, नांदेड, परभणी तिसरा टप्पा– ७ मे – रायगड, बारामती, धाराशीव, लातूर, सोलापूर, माढा, सांगली, सातारा, रत्नागिरी–सिंधुदुर्ग, कोल्हापूर, हातकणंगले चौथा टप्पा– १३ मे – नंदूरबार, जळगाव, रावेर, जालना, छत्रपती संभाजीनगर, मावळ, पुणे, शिरुर, अहमदनगर, शिर्डी, बीड पाचवा टप्पा– २० मे – धुळे, दिंडोरी, नाशिक, पालघर, भिवंडी, कल्याण, ठाणे, मुंबईतील सहा मतदारसंघ

# उद्योग, व्यवसाय उभारण्यासाठी नव्या योजना



**मुंबई । वृत्तसेवा**

बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्पांतर्गत कृषी उत्पादक कंपन्यांना उद्योग, व्यवसाय उभारण्यासाठी ६० टक्के अनुदान देण्यात येते. या योजनेंतर्गत प्रकल्प मंजुरीसंदर्भात असलेल्या उद्दिष्टाची अट मागे घेण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला. कंपन्यांना अनुदान मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. 'स्मार्ट' प्रकल्पांतर्गत प्रत्येक जिल्ह्यात 'प्रथम येणाऱ्यास प्राधान्य' या निकषानुसार शेतकरी उत्पादक कंपन्यांचेच प्रस्ताव मंजूर करण्याचे सरकारचे निर्देश होते. किती प्रस्ताव मंजूर करायचे, याचेही उद्दिष्ट दरवर्षी मिळते. सन २०२३–२४ या आर्थिक वर्षासाठी जिल्ह्यातील सुमारे ७० शेतकरी उत्पादक कंपन्यांनी उद्योग, व्यवसाय करण्यासाठी स्मार्ट कार्यालयाकडे अर्ज केले होते. मात्र केवळ ३१ कंपन्यांचे प्रस्ताव मंजूर करण्याचे उद्दिष्ट होते. परिणामी, पात्र असूनही शेतकरी उत्पादक कंपन्यांना प्रतीक्षा यादीत ठेवले. या योजनेंतर्गत एकूण प्रकल्प खर्चाच्या ६० टक्के अनुदान शेतकरी उत्पादक कंपन्यांना देण्यात येते. ज्या कंपनीने ५ कोटी रुपये खर्चाचा उपक्रम हाती घेतला त्यांना ३ कोटी रुपये अनुदान देण्यात येते. अनुदानाची रक्कम चांगली असल्याने 'स्मार्ट'कडे अर्ज करणाऱ्या शेतकरी उत्पादक कंपन्यांचा कल असतो. मात्र, चालू वर्षी केवळ ३१ शेतकरी उत्पादक कंपन्यांचेच प्रस्ताव मंजूर करावेत, असे निर्देश होते. शासनाच्या या अटीमुळे शेतकरी उत्पादक कंपन्या इच्छा असूनही या योजनेचा लाभ घेऊ शकत नाहीत. लक्ष्यांकाची अट रद्द करावी, अशी मागणी शेतकरी करीत होते. शासनाने या मागणीची दखल घेत विशिष्ट लक्ष्यांकाची अट रद्द केली.

## तरुणाची गोळ्या झाडून हत्या

**पुणे । वृत्तसेवा**

गेल्या काही महिन्यांमध्ये पुण्यात गुन्हेगारीच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे. कोयता गँगचा धुमाकूळ असो किंवा दिवसाढवळ्या गोळीबाराच्या घटना असो, यामुळे आता पुण्यातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. या घटनांना आळा बसवण्याचा प्रयत्न पुणे पोलिसांकडून करण्यात येत असला तरी आता जिल्ह्यातील इंदापूर येथे एका तरुणाची गोळ्या झाडून हत्या करण्यात आल्याने खळबळ उडाली आहे. इंदापूर शहरातील जगदंबा हॉटेलमध्ये जेवणासाठी गेलेल्या तरुणासोबत ही घटना घडली. काल शनिवारी (ता. १६ मार्च) रात्री ही धक्कादायक घडली असून अविनाश धनवे असे खून झालेल्या तरुणाचे नाव असून तो पुण्यातील आळंदी परिसरातील राहिवासी असल्याची माहिती समोर आली आहे. अविनाश बाळू धनवे (वय वर्ष ३४) हा आपल्या तीन ते चार मित्रांसोबत इंदापूर येथील जगदंब हॉटेलमध्ये जेवणासाठी आला होता. त्यानंतर तो आणि त्याचे मित्र जेवत असतानाच त्याच्यावर पाच ते सहा जणांनी हल्ला केला. एकाने पिस्तूलातून अविनाशवर दोन गोळ्या झाडल्या. एक गोळी त्याच्या डोक्याच्या उजव्या बाजूला तर दुसरी उजव्या पायाच्या जांघेत घुसली. जागेवरच खाली कोसळलेल्या अविनाशवर कोयत्याने वार करण्यात आले. त्यानंतर आरोपी तेथून पसार झाले.

# लातूरमध्ये गुंडांची धिंड काढत धडा शिकवला

**लातूर । वृत्तसेवा**

पुणे शहरानंतर लातूरमध्ये देखील एका कोयता गँगने चांगलीच दहशत माजवली. या कोयता गँगने शुक्रवारी (दि.१५)रात्रीच्या सुमारास दहशत सुरु केली होती. खंडणी वसुली करणे, गाड्यांची तोडफोड करणे, लोकांना दहशत दाखवणे, असा प्रकार या कोयता गँगने सुरु केला होता. दरम्यान, आता पोलिसांनी जिथे दहशत निर्माण केली, त्याच जागेवर नेत त्यांना धडा शिकवला आहे. पोलिसांनी या कोयता गँगची धिंड काढलीये. लातूरमध्ये दहशत निर्माण करणाऱ्या दोन जणांपैकी एकाला एमआयडीसी पोलिसांनी जेरबंद केलं होत. कायदेशीर प्रक्रिया पार पडल्यानंतर पोलिसांनी दहशत मिटवण्यासाठी वेगळा मार्ग अवलंबला आहे. कोयता गँगमधील दोन जणांपैकी एक तोहीत पठाण यास पोलिसांना पकडण्यात यश आलं होतं. तर यातील मोन्या बनसोडे हा अद्याप फरार आहे. यांनी ज्या ज्या भागात दहशत निर्माण केली होती. त्या त्या ठिकाणी तोहीत पठाण यास नेत पोलिसांनी उठबश्या काढायला लावल्या आहेत. भाजीविक्रेते,फळ विक्रेते यांना कोयता दाखवून दहशत निर्माण करणाऱ्यांना पोलिसांनी त्याच ठिकाणी नेऊन प्रसाद दिला आहे. ज्यांच्याकडून १०० पन्नास रुपये वसूल केले होते त्याच छोट्या व्यापाऱ्यांच्या दुकानासमोर नेत पोलिसांनी आरोपीला उठवशा काढायला लावलं आहे. रस्त्यावर भाजी विक्री करणाऱ्यांना पोलिसांनी संपर्क क्रमांकही दिला आहे. अशाप्रकारे कोणी जर दहशत निर्माण करत असेल तर त्याची माहिती तात्काळ पोलिसांना कळविण्यात यावी. आम्ही त्याचा बंदोबस्त करू असंही व्यापाऱ्यांना पोलिसांनी आश्वासन दिलंय.

# अनेक शाळांत स्वच्छतागृहेच नाहीत

**नागपूर । वृत्तसेवा**

राज्यातील ७ हजार ५२८ शाळांमध्ये मुली– मुलांसाठी स्वच्छतागृहेच उपलब्ध नसल्याची अत्यंत गंभीर बाब उघड झाली आहे. यामध्ये ४ हजार ५०४ शाळांमध्ये मुलांकरिता व ३ हजार २४ शाळांमध्ये मुलींकरिता स्वच्छतागृहेच नाहीत. परिणामी मुलांच्या शैक्षणिक सुविधांबाबत प्रशासन उदासीन आहे की काय, असा प्रश्न पालकांतून उपस्थित होत आहे. सन २०२१–२२ च्या यु– डायसच्या आकडेवारीनुसार राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या इयत्ता पहिली ते बारावीच्या ६५ हजार ६३९ शासकीय शाळा आहेत. यापैकी ६२ हजार ६१५ शाळांमध्ये मुलींकरिता स्वतंत्र स्वच्छतागृह व ६१ हजार १३५ शाळांमध्ये मुलांकरिता स्वच्छतागृह उपलब्ध



आहेत. उर्वरित शाळांमध्ये स्वच्छतागृहेच नाहीत. काही शाळांमध्ये योग्य देखभाल व दुरुस्तीअभावी ती स्वच्छतागृहे वापरता येत नाहीत, अशी स्थिती आहे. अस्वच्छतेमुळे त्याचा वापर मुली टाळत असल्याचे समोर आले आहे. स्वच्छतागृहे नसल्यामुळे मुली शाळाबाह्य होण्याची शक्यता अधिक आहे. म्हणूनच मुलींच्या आरोग्यासाठी सर्वसमावेशक आरोग्यदायी वातावरण बनविणे आवश्यक आहे, असा सूर पालकांतून उमटत आहे. शाळेत स्वच्छतागृह उपलब्ध नसल्यास दंडात्मक कारवाई करण्याबाबत शासनाने तरतूद केली आहे. समग्र शिक्षा अभियानांतर्गत शाळा अनुदानामध्ये स्वच्छता कार्य योजनेकरिता दहा टक्के निधी अंतर्भूत असतो. या निधीमधून किंवा लोकसहभाग, उद्योजकांचे सामाजिक उत्तरदायित्वच्या माध्यमातून शाळांमधील मुला–मुलींच्या स्वच्छतागृहांची दुरुस्ती करून ते विद्यार्थ्यांना वापरण्यायोग्य राहील, याची दक्षता घेण्याबाबत सर्व शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांना शिक्षण विभागाने सूचना करावी, अशीही मागणी करण्यात आली आहे.

महाराष्ट्रातील सर्व शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांतील स्वच्छतागृहे तात्काळ तपासणी करण्याबाबत व महिला धोरण २०१४ ची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याबाबतची मागणी सुराज्य निर्माण सेनेचे राज्याचे अध्यक्ष अमर एकाड, महिला अध्यक्षा पुष्टि भारद्वाज यांनी महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाच्या अध्यक्षा ॲड सुसीबेन शहा यांच्याकडे केली आहे. सुराज्य निर्माण सेनेने दिलेल्या निवेदनाची राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाने गंभीरपणे दखल घेतली आहे. राज्यातील शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांतील स्वच्छतागृहांबाबतच्या प्रकरणाची तात्काळ तपासणी करून त्याबाबत योग्य ती कार्यवाही करावी. याशिवाय त्याबाबतचा अहवाल आयोगाकडे सादर करावा, असे निर्देश महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाने शिक्षण आयुक्त सूरज मांढरे यांना दिले आहे. शिक्षण विभागाकडून अहवाल सादर झाल्यानंतर स्वच्छतागृहांची वस्तुस्थिती व त्याबाबतच्या उपाययोजनांची माहिती समोर येणार आहे.

## आहेरवाडी शिवारात आढळला अनोळखी व्यक्तीचा मृतदेह

परभणी – झिरोफाटा ते पूर्णा रस्त्यावरील आहेरवाडी शेतशिवार आश्रम शाळेजवळील शेतात एका अनोळखी (वय अंदाजे ५०) व्यक्तीचा कुजलेल्या आणि निवस्त्र अवस्थेत मृतदेह आढळून आला. ही घटना शनिवारी (दि.१६) सायंकाळी पाचच्या सुमारास उघडकीस आली. त्यामुळे या परिसरात खळबळ उडाली. आहेरवाडी शिवारात एक बंद पडलेली आश्रम शाळा आहे. येथे आहेरवाडी येथील मोरे कुटुंबीयांची शेती आहे. शनिवारी सायंकाळी साडेचार ते पाचच्या दरम्यान मोरे यांच्या शेतात काम करणारा सालगडी संतोष मोरे यांना काहीतरी सडलेला वास येवू लागला. तो वासाचा दिशेने शोध काढत पुढे गेला असता ज्वारीच्या पिकात एक पुरुष जातीचा विवस्त्र अवस्थेतील अनोळखी व्यक्तीचा मृतदेह आढळून आला. आहेरवाडीचे पोलीस पाटील बालाजी मोरे यांनी याची माहिती पूर्णा पोलीस ठाण्यात दिली.

# नगर तालुक्यातील रस्त्यासाठी कोटींचा निधी

**नगर । प्रतिनिधी**

गेल्या काही वर्षापासून वाळकी खंडाळा रस्त्याच्या कामासाठी ग्रामस्थांकडून वेळोवेळी मागणी होत होती. रस्ताच वाहतुकी योग्य नसल्याने नागरिकांची मोठी गैरसोय होत असल्याने नागरिक वैतागले होते. मात्र, या रस्त्यासाठी पाच कोटींचा निधी मंजुर झाल्याने अखेर वाळकी– खंडाळा रस्त्याचे काम लवकरच मार्गी लागून नागरिकांची कित्येक वर्षांपासून होणारी गैरसोय कायमची दूर होणार आहे. पावसाळ्यात रस्त्याने येणे–जाणे मोठे कठिण होत असे. रस्त्यावर मोठ मोठी खड्डे पडल्याने वाहन चालकांना मोठी कसरत करावी लागते. याच रस्त्यावर गहिनीनाथांचे भव्य–दिव्य मंदिर आहे. परमपूज्य महेंद्रनाथांच्या पुढाकारातून हे मंदिर साकारलेले आहे. खराब रस्त्यामुळे ग्रामस्थांप्रमाणे भक्तांचीही प्रचंड गैरसोय होत आहे. रस्त्याचा प्रथ मार्गी लावावा, अशी महेंद्रनाथांचीही मनोमन इच्छा होती. त्यांची ती इच्छा



आता लवकरच पूर्ण होणार आहे. भाजपाचे जिल्हाध्यक्ष दिलीप भालसिंग, नगर तालुका पंचायत समितीचे माजी उपसभापती रंगनाथ निमसे यांनी सदरील रस्त्याच्या कामासाठी आ. बबनराव पाचपुते व युवा नेते विक्रमसिंह पाचपुते यांच्याकडे विशेष पाठपुरावा केला. श्री. भालसिंग यांनी याकामी मुंबई वारीही अनेक वेळा केली. ग्रामस्थ बाळासाहेब धोंडे, ग्रामपंचायत सदस्य ओंकार निमसे, बाळासाहेब भालसिंग, राजेंद्र मुरुमकर, गोवर्धन भालसिंग, दशरथ यांनीही रस्त्याचे काम मार्गी लावण्याचे साकडे घातले होते. याची दखल आ. पाचपुते यांनी घेतली. मुंबईत नुकत्याच झालेल्या कॅबिनेटच्या बैठकीत सार्वजनिक बांधकाम मंत्री चव्हाण यांनी वाळकी खंडाळा या साडेपाच किलोमीटर रस्त्याच्या कामासाठी विशेष दुरुस्ती अंतर्गत ५ कोटींचा निधी मंजुर केला. रस्त्याच्या कामासाठी निधी मंजुर झाल्याने लवकरच रस्त्याचे काम मार्गी लागणार आहे. रस्त्यामुळे धनगरवाडी, वाळकी व खंडाळा येथील नागरिकांची रस्त्याअभावी होणारी गैरसोय आता दुर होणार आहे. रस्त्याच्या कामासाठी निधी उपलब्ध झाल्याने पालकमंत्री पाचपुते यांचे ग्रामस्थांनी विशेष आभार व्यक्त केले. श्रीगोंदा विधानसभा मतदारसंघात विविध रस्त्यांच्या कामासाठी ५० कोटींचा निधी मंजूर झाला. लोकसभा निवडणूक आचारसंहितेपूर्वी म्हणजे १५ मार्च रोजी निधीस मंजुरी मिळाली. श्रीगोंदा तालुक्यातील बेलवंडी – चिंभळा (८ कि. मी.), चिंभळा वांगदरी (६ कि. मी.), वडगाव शिंदोडी – लोणी व्यंकनाथ श्रीगोंदा (७.५ कि. मी), देवदैठण – राजापूर – पिंप्री कोलंदर या रस्त्यांच्या कामासाठी २५ कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला. तसेच नगर तालुक्यातील खंडाळा–वाळकी (५ कि. मी.), नारायणडोह बाबुर्डी घुमट (८ कि. मी.) तसेच निंबळक – चास खंडाळा वाळुंज या रस्त्यांच्या कामासाठीही २५ कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. सदरील रस्त्यांमुळे नागरिकांची अनेक वर्षांपासून होणारी गैरसोय लवकरच दूर होणार आहे.

## रस्त्याची दुरावस्था

केज - सारणी हा रहदारीचा रस्ता अत्यंत खराब झालेला आहे चक्क रस्त्यावर गुडघाभर खड्डे पडलेले आहेत नागरिकांना ये-जा करण्यासाठी मोठी कसरत करावी लागत आहे तात्काळ रस्ता दुरुस्त करावा अशी मागणी नागरिकांमधून होत आहे. आनंदगाव ते केज हा बाजारपेठ साठी अत्यावश्यक रस्ता. व्यापारी ,विद्यार्थी शेतकरी ,कर्मचारी या रस्त्याने मोठ्या प्रमाणात ये-जा करतात हा रस्ता उखडलेला आहे. गूढघाभर खड्डे पडल्याने दुचाकी चालवणे ही कठीण झाले आहे. खड्डे पडल्यामुळे वाहनांना अपघाताचे प्रमाणही वाढले आहे तात्काळ हा रस्ता डांबरीकरण करण्यात यावा अशी मागणी नागरिकांमधून केली जात आहे. आनंदगाव ते सारणी शाळा हा रस्ता अत्यंत खराब झालेला आहे. तो दुरुस्त करण्यात यावा यासाठी अनेक वेळा मागणी करून रस्ता केला जात नाही. हा रस्ता तात्काळ डांबरीकरण न झाल्यास तीव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा गावकऱ्यांच्या वतीने देण्यात आला आहे. केवळ दीड किलोमीटर अंतर जाण्यासाठी तब्बल अर्धा तासाचा वेळ लागत असेल तर त्यापेक्षा पांदण रस्ता चांगला म्हणावा लागेल. या रस्त्याने वागणे अवघड झाले.अनेक वेळा वाहने घसरून पडत आहेत. पण लक्ष कोण देणार हाच मोठा प्रश्न आहे.

## छात्रांच्या प्रशिक्षणासाठी फायरिंग रेंज

बीड - येथील योगेश्वरी शिक्षण संस्थेच्या परिसरात छात्रांच्या प्रशिक्षणासाठी फायरिंग रेंज उभारण्यात येणार असून फायरिंग रेंजचे भूमिपूजन गुरुवारी संस्थेचे अध्यक्ष डॉ . सुरेश खुरसाळे यांनी पाचवेळा टिकाव मारून केले . प्रमुख पाहुणे म्हणून सामाजिक कार्यकर्ते अभिजित जोंधळे व मेजर एस .पी . कुलकर्णी होते . या प्रसंगी संस्थेचे पदाधिकारी ड . शिवाजीराव कराड, कमलाकर राव चौसाळकर, गणपत व्यास , प्रा गोळेगावकर , डॉ साहेबराव गाठाळ , योशोदा राठोड , अंजली गोस्वामी, प्राचार्या वनमाला रेड्डी, प्राचार्य विश्वास साखरे, प्राचार्य पंजाब थारकर , प्राचार्य रमण देशपांडे, छात्रसेनाधिकारी मेजर शांतीनाथ बनसोडे, प्रा अशोक पाठक, शिवकुमार निर्मळे, सुंदर खडके, राजकुमार थोरात , शैलेश कंगळे, संजय कामखेडकर , डॉ . साधना चामले , प्रा आर . डी . जोशी, पंडित कराड , मठपती, ज्योती चव्हाण, स्मीता धावडकर, बी .के . मसने , रमण सोनवळकर , कर्मचारी व छात्र सैनिक उपस्थित होते . स्वानी रामानंद तीर्थ महाविद्या लयाच्या मागील बाजूला रेंज उभारण्यात येणार आहे .शहरातील राष्ट्रीय छात्रसेनेतील सर्व छात्रांना या फायरिंग रेंजवर प्रशिक्षण देण्यात येणार आहे . या रेंजचे नाव नेताजी बोस फायरिंग रेंज असे ठेवण्यात आले असून त्याचा फायदा परिसरातील युवा - युवतींना होणार आहे .

## संचेती हॉस्पिटलची रुग्णसेवा -डॉ.संचेती


बीड - वैद्यकीय क्षेत्रात काम करताना रुग्णसेवा हीच ईश्वरसेवा हीच भावना बाळगत रुग्णांची सेवा करत आहोत असे मत जगप्रसिद्ध अस्थिरोग तज्ञ तथा संचेती हॉस्पिटलचे संचालक डॉ. पराग संचेती यांनी व्यक्त केले आहे. ते आज अंबाजोगाई शहरात प्रियदर्शनी क्रीडा मंडळ, आय एम ए व ए एम पी ए अंबाजोगाई च्या वतीने मोफत आरोग्य शिबिरात बोलत होते. याप्रसंगी व्यासपीठावर प्रियदर्शनी क्रीडा मंडळाचे संस्थापक राजकिशोर मोदी,डॉ पराग संचेती, डॉ संदीप जावळे,डॉ शैलेश देशमुख, स्वा रा ती चे अधिष्ठाता डॉ धपाटे, आय एम एचे अंबाजोगाई अध्यक्ष डॉ. नवनाथ घुगे, ए एम पी ए अंबाजोगाई चे डॉ.राहुल धाकडे डॉ अमोल चव्हाण,कचरूलाल सारडा, रोटरीचे स्वप्नील परदेशी , गणेश राऊत हे उपस्थित होते. या आरोग्य शिबिरात ६०० च्या वर रुग्णांवर मोफत उपचार व निदान करण्यात आले. आरोग्य शिबिराचे उद्घाटन धनवंतरी तसेच माता योगेश्वरी देवीच्या प्रतिमांचे पूजन करून करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक ए एम पी ए चे राहुल धाकडे यांनी केले. प्रियदर्शनी क्रीडा व व्यायाम मंडळाचे संस्थापक राजकिशोर मोदी यांनी आपले विचार व्यक्त केले. त्यांनी जगप्रसिद्ध असलेले डॉ.पराग संचेती यांनी आपल्या कामाच्या व्यस्ततेतून अंबाजोगाई सारख्या ग्रामीण भागातील रुग्णांसाठी वेळ देऊन त्यांच्यावर उपचार केले. त्याबद्दल डॉ.पराग संचेती यांचे अभिनंदन केले.




# वडवणी तालुक्याच्या औद्योगिक वसाहतीसाठी आ.सोळंके सदैव तत्पर

**वडवणी । प्रतिनिधी**

वडवणी तालुक्यातील जनतेच्या मुख्य प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी माजलगाव विधानसभा मतदारसंघाचे विद्यमान आमदार प्रकाश सोळंके हे



सदैव तत्पर असतात. चार दिवसांपूर्वीच त्यांनी वडवणी नगरपंचायत हद्दीतील विकास कामांसाठी कोट्यावधी रुपयांचा निधी उपलब्ध करुन दिला आहे. पुन्हा एकदा आ. प्रकाश सोळंके यांनी तालुक्यातील जनतेचे हित लक्षात घेता वडवणी तालुक्यासाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम १९६१ नुसार साधण्यासाठी एक प्रशस्त एमआयडीसी असावी म्हणून त्यांनी याबाबत वेळोवेळी पाठपुरावा करुन स्वतः मंत्रालयीन कामकाजात लक्ष घालून प्रशासनातील संबंधित वरिष्ठ अधिकारी यांच्याकडून हे महत्त्वाचे काम करुन घेतलेले आहे. त्यामुळे आता वडवणीकरांसाठी बहुप्रतिक्षीत असलेल्या एमआयडीसीचे नोटिफिकेशन निघालेले आहे व आजवर वडवणी शहरातील विकासकामांसाठी तब्बल ५६ कोटींचा निधी देखील प्राप्त झालेला आहे. त्याचप्रमाणे वडवणी शहरातील बाजारतळावर उभारण्यात आलेल्या व्यापारी संकुलातील गाळ्यांचा लिलावही लवकरच होणार असून बाजार तळातील व्यापारी संकुलातील हे गाळे व्यावसायिकांना ३० वर्षांसाठी भाडेतत्त्वावर देण्यात येणार आहेत. एकंदरीतच वडवणी शहरावर सरकारकडून गुड न्यूजचा एक प्रकारे वर्षावच झाला असून बोले तैसा चाले त्यांची वंदावी पाऊले याप्रमाणे आमदार प्रकाश दादा सोळंके हे जे बोलतात तेच करतात हे पुनश्च एकदा अधोरेखित झाले आहे. याबाबत अधिक माहिती देताना आ. प्रकाश सोळंके यांनी सांगितले की, माजलगाव विधानसभा मतदारसंघातील वडवणी तालुक्यामध्ये उद्योग व्यवसाय करणाऱ्या उद्योजकांना आपला उद्योग पुढे पुढे घेवून जाण्यासाठी बळ मिळावे म्हणून स्वतंत्र औद्योगिक वसाहत असावी असे सुरुवातीपासून वाटत होते. आपण यासाठी सदर प्रक्रिया जलद गतीने करण्यासाठी पाठपुरावा केला. वडवणी तालुक्यातील पुसरा शिवारातील जमीन संपादन करण्यासाठी निश्चित केली. या शिवारातील जमीन गट क्रमांक २७९ मधील ५० हेक्टर क्षेत्र या औद्योगिक वसाहतीसाठी उद्योग, उर्जा, कामगार व खनिकर्म विभागाच्या महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम १९६१ क्रमांक आयडीसी २०२४ पत्र क्रमांक १४४ उ.१४ महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम १९६१ (१९६२ चा महा. ३) चे कलम २, खंड (ग) अन्वये प्रदान केलेल्या शक्तीचा वापर करुन महाराष्ट्र शासन याव्दारे यासोबत जोडण्यात आलेल्या अनुसूचित उल्लेख केलेले मौजे पुसरा तालुका वडवणी जिल्हा बीड येथील गट क्रमांक २७९ पै. क्षेत्र ५० (हे. आर.) औद्योगिक क्षेत्र म्हणून जाहीर करीत आहे. या क्षेत्राची चतुः सिमा उत्तरेस - मौजे पुसरा गट क्रमांक २३८, २३९, २४०, २६५, २६६, २७१, २७२, २७७, २७८ दक्षिणेस - मौजे पुसरा गट क्रमांक १८१, १८३, १९७, १९८, १९९, २१३, २२१, २२३, २२४, २२५, २२६ पुर्वेस मौजे पुसरा येथील गट क्रमांक ११९, १८३, १८२, १८१ व तिगांव रस्ता त्याचबरोबर पश्चिमेस - मौजे पुसरा गट क्रमांक २३०, २३१, २३४, २३५, २३६, २४०, २४१, २४२, २७२, २७३ अशा प्रकारची चतुः सिमा आहे. वरील गट नंबर मधील सदरची जमीन वडवणी तालुक्याच्या एमआयडीसी साठी आरक्षित करण्यात आलेली आहे. नगरपंचायत प्रशासकीय इमारत ५ कोटी, बुध्दविहार १ कोटी, राम मंदिर सभागृह ३५ लाख , बिचकूलदरा सभागृह २५ लाख, सती सामत मंदिर सभागृह २५ लाख, दत्तमंदिर तांडा, दत्तमंदिर सभागृह २५ लाख, स्वामी समर्थ मंदिर सभामंडप २५ लाख,बिरोबा मंदिर सभा मंडप २० लाख, काळा हनुमान मंदिर सभामंडप १० लाख , हिंगलाजमाता मंदिर सभामंडप १७ लाख, विठ्ठल रुक्मिणी मंदिर सभामंडप १७ लाख, शेरीतांडा सभामंडप १७ लाख, ठाकरवाडा तांडा सभामंडप १० लाख, विठ्ठल रुक्मिणी तांडा सभामंडप १० लाख, संत शिरोमणी सभामंडप १० लाख, दत्त मंदिर सभामंडप १० लाख, शहरातील प्रमुख रस्ते २० कोटी, प्रभागातील इतर रस्ते व नाल्या १६ कोटी, शादीखाना १ कोटी, बाजारतळ विकसित करणे १ कोटी, जलशुध्दीकरण केंद्र संरक्षण भिंत व स्टोअर रुम ९० लाख, वडवणी शहरात गार्डन २ कोटी, वडवणी शहरात संग्रहालय, वाचनालय व जिम बांधकाम ५ कोटी ५० लाख, संत भगवानबाबा मंदिर सभामंडप २० लाख, दत्त मंदिर सभामंडप १० लाख, संत भीमसिंहबाबा मंदिर सभामंडप २० लाख, विश्वकर्मा मंदिर सभामंडप १० लाख असे एकूण ५६ कोटी रुपयांचे निधी प्राप्त झालेला आहे. व शहरातील आणखी विविध विकास कामांसाठी कोट्यावधी रुपयांचे प्रस्तावित कामे असून वडवणीकरांना दिलेले १०० कोटी रुपयांचे आश्वासन लवकरच पूर्ण होईल अशी माहिती नगराध्यक्ष शेषेराव जगताप यांनी दिली आहे. वडवणी तालुक्याच्या विकासात भर देण्याबरोबरच शहर व तालुक्यातील व्यापारी, लघुउद्योजक, व्यवसायीकांमध्ये भरभराटी व्हावी व तालुक्यातील युवकांच्या हाताला काम मिळावं या प्रमुख उद्देशाने या तालुक्याची औद्योगिक वसाहत एमआयडीसी साठी मंजुरी मिळवून घेतली आहे. लवकरच याची उभारणी करण्यासाठी उपाययोजना लागु करु असं मत विद्यमान आमदार प्रकाश सोळंके यांनी आमच्या प्रतिनिधीशी बोलतांना व्यक्त केले. वडवणी शहरातील विविध विकास कामांसाठी माजलगाव विधानसभा मतदारसंघाचे विद्यमान आमदार प्रकाश सोळंके यांनी भरभरुन निधी उपलब्ध करुन देण्यास सुरुवात केली असून आतापर्यंत तब्बल ५६ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध झाला आहे. विद्यमान आमदार प्रकाश सोळंके यांच्या आशीर्वादाने वडवणी शहरात नाविन्यपूर्ण विकासाचा उपक्रम या निधीतून राबविला जाणार आहे. शहरातील रस्ते, बुध्दविहार, सभामंडप, शादीखाना, नाली, रस्ते, संग्रहालय, वाचनालय, जिम, गार्डन, बाजारतळ विकसित करणे ही कामे दर्जेदार केली जाणार आहेत. आता त्यांनी वडवणी शहरातील व्यापारी बांधवांच्या त्यांच्या उद्योग, व्यवसाय वाढीसाठी व तालुक्यातील युवक उद्योजकांना आपल्या पायावर उभे राहण्यासाठी वडवणी तालुक्यासाठी नव्याने एमआयडीसी निर्माण होत आहे. पुसरा येथे ही एमआयडीसी होत असून तसे शासकीय नोटिफिकेशन निघाले आहे. वडवणी तालुका हा यामुळे एका वेगळ्या उंचीवर नेवून ठेवण्याचे काम होत आहे. आ. प्रकाशदादा सोळंके हेच वडवणी तालुका विकासाचे मॉडेल आहेत असे मत नगराध्यक्ष शेषेराव जगताप यांनी व्यक्त केले.

## मुख्याध्यापकावर हल्ला करणारे शिक्षक निलंबित

**बीड । प्रतिनिधी**

शाळेतील किरकोळ वादातून मुख्याध्यापकावर बतईने हल्ला करून जखमी करणाऱ्या दोन शिक्षकांवर गुन्हा दाखल झाल्यानंतर सार्वजनिक ठिकाणी गुरूजींचे गैरवर्तन लक्षात घेत जिल्हा परिषद प्रशासनाने तातडीने कार्यवाही करीत गेवराई तालुक्यातील शेकटा येथील जिल्हा परिषद शाळेतील शिक्षक संतोष व रघुनाथ नागरगोजे यांना तडकाफडकी निलंबित केले आहे. गेवराई तालुक्यातील शेकटा येथील जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक अंबादास मल्हारी नारायणकर (वय ५३, रा. विश्वासनगर, बीड) यांच्यासह सहशिक्षक घाडके, रघुनाथ नागरगोजे, लक्ष्मण परजणे, हे बीडवरून शाळेत दररोज एकाच गाडीतून जातात. १२ मार्च रोजी त्यांच्यात वाद झाल्यानंतर मुख्याध्यापक नारायणकर यांच्यावर बतईने हल्ला करण्यात आला होता. जिल्हा परिषद शिक्षकांनी धिंगाणा करून गैरवर्तन केल्याने त्यांची कृती जिल्हा परिषद जिल्हा सेवा (वर्तणूक) नियम १९६७ मधील नियमांचा भंग करणारी असल्याने विभागीय चौकशी करण्यासाठी सद्यस्थितीत पदावरून दूर करण्यासाठी संतोष गिरी व रघुनाथ नागरगोजे यांना जिल्हा परिषद जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील कलम ३ (२) मधील तरतुदीनुसार निलंबित करण्याचे आदेश सीईओ संगितादेवी पाटील यांनी दिले.




वडवणी - रमेश आडसकर यांच्या हस्ते जिजाऊ महिला नागरी सहकारी पतसंस्था मर्या तेलगांव यांच्यावतीने आयोजित करण्यात आलेल्या रंगभरण स्पर्धेचे बक्षीस वितरण करण्यात आले. यावेळी महादेव तोंडे सभापती कृषी उत्पन्न बाजार समिती धारूर, सुनिल शिनगारे उपसभापती,बंडू खांडेकर अध्यक्ष देवदूत प्रतिष्ठान,अनिल महाजन सदस्य पत्रकार संघ,दिपक मोरे , धुमाळ, मायकर, रमेश नखाते, पतसंस्थेच्या चेअरमन शितलताई मोरे.

## राष्ट्रीय सेवा योजना निवासी शिबिराचा समारोप

**बीड । प्रतिनिधी**

तालुक्यातील मंझेरी येथे आदर्श शिक्षण संस्थेच्या सोनाजीराव क्षीरसागर होमिओपॅथिक वैद्यकीय महाविद्यालयाच्या वतीने व आरोग्य विज्ञान विद्यापीठ नाशिक च्या सौजन्याने दि. ११ मार्च पासून सुरू झालेल्या राष्ट्रीय सेवा योजना निवासी शिबिराचा आज दुपारी ४ वाजता माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांच्या अध्यक्षतेखाली समारोप समारंभ आयोजित करण्यात आला आहे. या समारोप प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ.मिलिंद निकुंभ, प्रति कुलगुरू महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ नाशिक, डॉ बाळासाहेब पवार, अध्यक्ष स्थायी समिती, आरोग्य विज्ञान विद्यापीठ,नाशिक, डॉ. देवेंद्र पाटील, संचालक, विद्यार्थी कल्याण मंडळ, (एम.यु.एच.एस.) नाशिक आदी उपस्थित राहणार आहेत. याच वेळी विद्यापीठाच्या स्थायी समितीच्या अध्यक्षपदी डॉ बाळासाहेब पवार आणि विद्यार्थी कल्याण मंडळाच्या संचालकपदी डॉ देवेंद्र पाटील यांची निवड झाल्याबद्दल माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांच्या हस्ते सन्मान करण्यात येणार आहे. सरपंच अंबादास गुजर मंझेरी, ह.भ.प.ज्ञानेश्वर महाराज मंझेरीकर, दिनकर कदम, विलास बडगे, अरुण डाके, नानासाहेब काकडे, महाविद्यालयाचे सल्लागार डॉ.अरुण भस्मे हे उपस्थित राहणार आहेत.

## शेतकऱ्याची विषारी औषध प्राशन करून आत्महत्या

**माजलगाव । प्रतिनिधी**

तालुक्यातील पात्रुड येथे एका शेतकऱ्याने विषारी औषध प्राशन करून आत्महत्या केली. तर लऊळ येथील एका शेतकऱ्याने गळफास घेऊन स्वतःचे जीवन संपविले. या दोन्ही घटना शुक्रवारी रात्री घडल्या आहेत. दरम्यान पोलिसात आकस्मात गुन्ह्याची नोंद करण्यात



आली आहे. अधिक माहिती अशी कि, पात्रुड येथील शेतकरी सत्यभान भगवान शितकर (वय-२९) या तरुण शेतकऱ्याने शेतीतील नापिकीला कंटाळून शुक्रवारी (दि. १५) विषारी औषध प्राशन करून आत्महत्या केली. तर लऊळ येतील शेतकरी बाळू अंकुश आवटे (वय-२५) या तरुण शेतकऱ्याने गळफास घेऊन शेतातील लिंबाच्या झाडाला गळफास घेऊन आत्महत्या केली. आत्महत्तेचे कारण स्पष्ट झाले नाही

# तीर्थक्षेत्र विकास भरघोस निधी

**बीड । प्रतिनिधी**

धाकटी पंढरी श्री.क्षेत्र नगद नारायण गड येथील विकास व्हावा, अशी भक्तांची मागणी होती. या मागणीच्या पाठपुराव्यानंतर आता २४ कोटी रूपयांच्या विकास आराखड्यास दि.१५ मार्च रोजी सुधारित प्रशासकिय मान्यता देण्यात आली आहे. यामुळे आता नारायण गडाचा कायापालट होणार आहे. सन २०१८ मध्ये स्व.विनायक मेटे यांनी पुढाकार घेवून धाकटी पंढरी श्री.क्षेत्र नगद नारायण गड येथील विकास कामात लक्ष घातले . तत्कालीन पालकमंत्री पंकजा मुंडे यांच्या काळात त्याच काळात २५ कोटी रूपयांचा आराखडा तयार करण्यात आला होता. त्यास तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणविस यांनी मंजूरी दिली आणि अडीच कोटी रूपयांचा निधी देखील वर्ग केला. पुढे सरकारमध्ये बदल झाला आणि मंजूर आराखड्यास निधी मिळालेला नाही. यानंतर शिवसेनेचे जिल्हाप्रमूख सचिन मुळूक, गडाचे विश्वस्त अनिल जगताप, विश्वस्त बळीराम गवते, बी.बी.जाधव, गोवर्धन काशीद आणि सर्वच मंडळींनी नारायण गडचे महंत शिवाजी बाबा यांच्या



मार्गदर्शनाखाली उर्वरित निधी आणण्यासाठी प्रयत्न सुरू केले. मागील काही महिन्यांपासून यासाठी पाठपुरावा सुरू होता. अखेर दि.१५ रोजी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणविस, पालकमंत्री धनंजय मुंडे ,गिरीश महाजन, यांच्या माध्यमातून या आराखड्यात सुधारित मान्यता देण्यात आली यासाठी आमदार लक्ष्मण पवार तसेच माजी आमदार अमरसिंह पंडित साहेब यांचं मोलाचे सहकार्य लाभले मंदिर परिसरात दगडी फरशी बांधकाम, प्रवेशद्वारावर सुंदर असे वास्तुशिल्प चारही दिशांना, लँडस्केप, सार्वजनीक शौचालय, पाणी व जलव्यवस्थापनात पाण्याची टाकी, पाईपलाईन व उपांग दुरूस्तीची कामे, जलसंवर्धन कामे, वाहनतळ, सिंमेट कॉंक्रिट वाहनतळ, बस स्टँड, दोन प्रसादालय, घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन. इत्यादी महत्त्वाची कामे होणार असून या कामी मनोज जरांगे पाटील यांनीही गडाच्या निधीसाठी थेट मुख्यमंत्र्यांशी संपर्क साधून पाठपुरावा केला होता मागील काही महिन्यांपासून मी व विश्वस्त नारायणगडच्या कामांसाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेब दोन्ही उपमुख्यमंत्री पालकमंत्री धनंजय मुंडे, पंकजाताई मुंडे व गिरीश महाजन यांच्याकडे पाठपुरावा केला. यासाठी आमदार लक्ष्मण पवार तसेच माजी आमदार अमरसिंह पंडित साहेब यांचे सहकार्य लाभले. यामुळे एवढ्या मोठ्या प्रमाणात नारायणगडासाठी निधी उपलब्ध झाला त्याबद्दल सर्वांचे आभार . तसेच श्री क्षेत्र नारायण गडाला आलेल्या निधीमध्ये कोणत्याही क्षीरसागरां चे योगदान नाही विनाकारण कोणीही श्रेय घेण्याचा प्रयत्न करू नये श्री.क्षेत्र नगद नारायण गडाचा विकास करण्यासाठी गडाचे महंत शिवाजी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली आम्ही विश्वस्त आणि सचिन मुळूक सर्वजण एकत्रित पाठपुरावा करत आहोत. नारायण गडच्या विकासासाठी २४ कोटी रूपये मिळत असून त्यातून मोठे काम मार्गी लागेल, ही भक्त म्हणून भावना आणि समाधान आहे. धाकटी पंढरी नगद नारायण गडाच्या विकास कामासाठी निधी उपलब्धतेचा अद्यादेश शनिवारी दुपारी गडाचे महंत महाराज यांच्याकडे सुपूर्द करण्यात आला.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed, Beed -431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq-Beed Dist-Beed pin -431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail-dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper : https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि.बीड, -४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता.जि.बीड -४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper : https://marathwadapatra.com,Eportal-https://marathwadapatra.com